सन २०१७-१८ करिता जागतिक कृषि गणना योजनेसाठी निधी वितरीत करणेबाबत..

महाराष्ट्र शासन
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्रमांक :- कृगयो -२०१७/प्र.क्र.६७/११-अे
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय (विस्तार), मुंबई-४०० ०३२
दिनांक :- १७ नोव्हेंबर, २०१७

<u>वाचा :-</u> १) शासन निर्णय कृषि व पदुम विभाग क्र. पदसातत्य-२०१६/प्र.क्र.२५/११-अे, दि.२२.२.२०१७

२) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि.१८.४.२०१७

३) भारत सरकार, कृषि मंत्रालय, कृषि व सहकार विभाग, कृषि गणना प्रभाग यांचे पत्र क्र.- ११०१४-१/२०१७-ACU, दि.३१.०५.२०१७

४) उप आयुक्त (कृषि गणना), कृषि आयुक्तालय, महराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.कृआ/कृग/१७-१८/निधी/प्र.क्र.३/२२०/२०१७, दि.०२.०६.२०१७

५) उप आयुक्त (कृषि गणना), कृषि आयुक्तालय, महराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.कृआ/कृग/१७-१८/निधी/प्र.क्र.३/२७५/२०१७, दि.१६.०८.२०१७

६) उप आयुक्त (कृषि गणना), कृषि आयुक्तालय, महराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.कृआ/कृग/अनुदान/बीडीएस/प्र.क्र.३/२०१७-१८/३६६/२०१७, दि.३१.१०.२०१७

<u>प्रस्तावना</u> :-

जागतिक कृषि गणना या १०० % केंद्रपुरस्कृत योजनेकरिता केंद्र शासनाने सन २०१६-१७ या वर्षामध्ये उपलब्ध करुन दिलेल्या रु.१३३.४८ लाख रकमेपैकी रु.१३१.४४ लाख इतका निधी खर्ची पडला व रु.२.०४ लाख इतका निधी अखर्चित राहीलेला आहे. सदर निधी शासकीय कोषागारात अखर्चित राहीला असून प्रस्तुत अखर्चित निधी सन २०१७-१८ या वर्षामध्ये पुनर्विनियोजनेद्वारे वापरण्यास केंद्र शासनाने त्यांच्या दि.३१.०५.२०१७ च्या पत्रान्वये मान्यता दिली असल्याने तसेच प्रस्तुत अखर्चित रु.२.०४ लाख निधी शासकीय कोषागारात आहरीत न होता शिल्लक असल्याने निधी वितरीत करण्याची विनंती कृषि आयुक्तालयाने दि.१६.०८.२०१७ च्या पत्रान्वये केली आहे. तसेच जागतिक कृषि गणना या १०० टक्के केंद्र पुरस्कृत योजनेसाठी (२४०१ ०९९६) सन २०१७-१८ या वर्षाकरीता पहिल्या हप्त्यापोटी केंद्र शासनाकडून रु.८२.३५ लाख प्राप्त झाले असून सन २०१७-१८ या वर्षाकरीता रु.४०.७३ लाख इतके लेखानुदान यापूर्वीच प्राप्त झाले असल्याने रु.८२.३५ इतक्या केंद्र शासनाकडून प्राप्त पहिल्या हप्त्यातून रु.४०.७३ लाख इतके लेखानुदान वजा करता उर्वरीत रु.४१.६२ लाख तसेच सन २०१६-१७ या वर्षातील अखर्चित राहीलेली रु.२.०४ लाख अशी एकुण **रु.४३.६६** लाख इतकी रक्कम मासिक निधी वितरण प्रणालीवर उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय</u> :-

जागतिक कृषि गणना या १०० टक्के केंद्र पुरस्कृत योजनेकरिता केंद्र शासनाने सन २०१६-१७ या आर्थिक वर्षामधील अखर्चित रु.२.०४ लाख इतकी रक्कम सन २०१७-१८ या वर्षामध्ये

पुनर्विनियोजनेद्वारे खर्च करण्यास मंजुरी प्रदान केली आहे. तसेच सदरची रक्कम सन २०१७-१८ या वर्षामध्ये खर्च करण्यास राज्य शासनाने देखील मान्यता दिलेली आहे. आता संदर्भ क्र. ६ अन्वये कृषि आयुक्तालयाने जागतिक कृषि गणना या १०० टक्के केंद्र पुरस्कृत योजनेसाठी (२४०१ ०९९६) सन २०१७-१८ या वर्षाकरीता पहिल्या हप्त्यापोटी केंद्र शासनाकडून रु.८२.३५ लाख प्राप्त झाले असल्याचे कळविले आहे. सन २०१७-१८ या वर्षाकरीता रु.४०.७३ लाख इतके लेखानुदान यापूर्वीच प्राप्त झाले असल्याने रु.८२.३५ इतक्या केंद्र शासनाकडून प्राप्त झालेल्या पहिल्या हप्त्यातून रु.४०.७३ लाख इतके लेखानुदान वजा करता उर्वरीत रु.४१.६२ लाख तसेच पुनर्विनियोजनेद्वारे उपलब्ध रु.२.०४ लाख अशी एकुण (**रु.४१.६२ लाख + २.०४ लाख**) = **४३.६६ लाख** इतकी रक्कम खालीलप्रमाणे वितरीत करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

(रु. लाख)

अ.क्र.	बाब	निधी
१	वेतन - ०१	१९.६७
२	प्रवास भत्ता - ११	०.५१
३	कार्यालयीन खर्च - १३	२.३५
४	प्रकाशने - १६	०.९३
५	इतर खर्च - ५० (मानधन व टॅब्युलेशन)	२०.२०
	एकुण	**४३.६६**

२. प्रस्तुत बाबींवर होणारा खर्च खालील लेखाशिर्षाखाली सन २०१७-१८ करिता मंजूर केलेल्या अर्थसंकल्पीय तरतूदीतून भागविण्यात यावा:-

"मागणी क्रमांक डी-३,

२४०१, पीक संवर्धन

१११ कृषि अर्थशास्त्र व सांख्यिकी

केंद्र पुरस्कृत योजना

(००) (१०) जागतिक कृषि गणना - (१०० टक्के केंद्र पुरस्कृत) (२४०१ ०९९६)"

३. प्रस्तुत प्रयोजनार्थ सहाय्यक संचालक (लेखा - १), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना आहरण व संवितरण अधिकारी तर संचालक (विस्तार व प्रशिक्षण), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

४. प्रस्तुत शासन निर्णय वित्त विभागाने त्यांच्या अनौपचारीक संदर्भ क्र.अनौ-४३६/अर्थोपाय, दि.०९.१०.२०१७ अन्वये अन्वये दिलेल्या सहमतीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०१७१११७१५३९१७१५०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Sharad Balkrishna Pawaskar

Digitally signed by Sharad Balkrishna Pawaskar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture and Adf Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=f4ebb91d526d59e93b9365fba816854d2dfa38e53ed59ae4b31ba8260ba52882, cn=Sharad Balkrishna Pawaskar
Date: 2017.11.17 15:44:39 +05'30'

(श. बा. पावसकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति -

१. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे (५ प्रती)
२. उप-आयुक्त (कृषि गणना), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-५
३. सहाय्यक संचालक (लेखा-१), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-५
४. सहाय्यक संचालक (अर्थसंकल्प), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-५
५. महालेखापाल, (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर
६. संचालक, लेखा व कोषागारे, नवीन प्रशासन भवन, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
७. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे
८. वित्त विभाग (व्यय-१) / (अर्थसंकल्प-१३) / (अर्थोपाय), मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
९. नियोजन विभाग (कार्यासन-१४३१), मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
१०. अपर मुख्य सचिव (कृषि) यांचे स्वीय सहाय्यक, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-०३२
११. उपसचिव (११-अे / २-अे) यांचे स्वीय सहाय्यक, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-०३२
१२. कक्ष अधिकारी (२-अे), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
१३. निवड नस्ती, कार्यासन - ११-अे.